# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः24.08.2025** **वारःरविवार**

---

- भारत तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या मार्गावर - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.
- अंतराळ क्षेत्रात भारतीय तरुणांसाठी मोठी संधी असल्याचा पंतप्रधानांचा विश्वास.
- अखिल भारतीय विधीमंडळ पीठासीन अधिकारी परिषद आजपासून नवी दिल्लीत सुरू होणार.

आणि
- आशियाई नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय खेळाडूंची सुवर्ण कामगिरी.

वर्ल्डलीडरफोरम

भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था आहे आणि लवकरच ती जागतिक स्तरावर तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या मार्गावर असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते काल दिल्ली इथं एका खाजगी माध्यम संस्थेने आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. भारत आज सुधारणा, कामगिरी, परिवर्तन या मंत्राने जगाला मंद गतीने होणाऱ्या विकासातून बाहेर काढण्यास मदत करण्याच्या स्थितीत आहे. भारताची अर्थव्यवस्था झपाट्याने वेग घेत असल्याच्या मुद्द्यावर बोलताना मोदी म्हणाले. . . . . . . .

बाईट : नरेंद्र मोदी 48 सेकंद.

भारत आणि अमेरिके दरम्यान व्यापार विषयक वाटाघाटी अद्याप सुरु असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी याच कार्यक्रमात म्हटलं आहे. देशातले शेतकरी आणि लघु उत्पादकांच्या हिताचं रक्षण करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं जयशंकर यावेळी म्हणाले. अमेरिकेबरोबरच्या वाटाघाटींमध्ये भारताला आपल्या मर्यादांची स्पष्ट जाणीव असून, देशहित लक्षात घेऊनच कोणताही निर्णय घेतला जाईल, असं त्यांनी स्पष्ट केलं. अमेरिकेनं भारताच्या तेल आयातीवर निर्बंध लादले असले, तरी सर्वात मोठा तेल आयातदार असलेल्या चीनला मात्र त्यामधून वगळल्याचं त्यांनी नमूद केलं.

अंतरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शास्त्रज्ञांना मानवतेच्या भविष्याकरिता अवकाशाच्या खोल शोधासाठी तयारी करण्याचं आवाहन केलं आहे. काल राष्ट्रीय अवकाश दिनानिमित्त एका चलचित्र संदेशात मोदी म्हणाले

की, भारत चंद्र आणि मंगळावर पोहोचला असल्याचं सांगताना मोदी यांनी भारत क्रायोजेनिक इंजिन आणि इलेक्ट्रिक प्रोपल्शनसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानात वेगाने प्रगती करत आहे असं म्हणाले. आपल्या शास्त्रज्ञांच्या समर्पित प्रयत्नांनी भारत लवकरच गगनयान मोहीम सुरू करेल आणि येत्या काही वर्षांत स्वतःचे अंतराळ स्थानक उभं करेल. पंतप्रधानांनी ठामपणे प्रतिपादन केलं की ३५० हून अधिक स्टार्टअप्स अंतराळ तंत्रज्ञानात नवोपक्रम आणि गतीचे इंजिन म्हणून उदयास येत आहेत. खाजगी क्षेत्राने बनवलेला पहिला पीएसएलव्ही रॉकेट लवकरच प्रक्षेपित केला जाईल अशी घोषणाही त्यांनी केली. अंतराळ क्षेत्रात भारतीय तरुणांसाठी एक मोठी संधी निर्माण होत असल्याचं पंतप्रधान यावेळी म्हणाले. त्यांनी पीक विमा योजनांमध्ये उपग्रह-आधारित मूल्यांकन, मच्छीमारांसाठी उपग्रह-सक्षम माहिती आणि सुरक्षा, आपत्ती व्यवस्थापन आणि पंतप्रधान गति शक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅनमध्ये भू-स्थानिक डेटाचा वापर यासारख्या उदाहरणांचा उल्लेख केला.

अमितशहा

दिल्लीत आज केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज अखिल भारतीय विधीमंडळ पीठासीन अधिकारी परिषदेचे उद्‌गाटन होणार आहे. देशातील पहिले निर्वाचित विधानसभा अध्यक्ष विठ्ठलभाई पटेल यांच्या अध्यक्षपद स्वीकारण्याच्या शताब्दी वर्षाच्या स्मरणार्थ या परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. या परिषदेला 29 राज्यांच्या विधानसभांचे सभापती, सहा राज्यांतील विधान परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष उपस्थित राहाणार आहेत. या दरम्यान विठ्ठलभाई पटेल यांचे जीवन, संसदीय योगदान आणि स्वातंत्र्यलढ्यातील भूमिका यांवर आधारित प्रदर्शन, माहितीपट दाखवण्यात येणार आहे. त्यासह स्मारक टपाल तिकीटाचे अनावरण होणार असल्याची माहिती दिल्ली विधानसभेचे अध्यक्ष विजेंदर गुप्ता यांनी दिली आहे. या परिषदेच्या समारोप सत्राला लोकसभा अद्‌यक्ष ओम बिर्ला उपस्थित राहाणार आहेत. तर राज्यसभेचे उपसभापती, हरिवंश नारायण सिंह तसंचकेंद्रीय मंत्री गजेंद्र सिंह शेखावत,संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू आणि माजी लोकसभा अध्यक्ष मीरा कुमार आदी मान्यवर उपस्थित राहाणार आहे.

जीएसटी

येत्या तीन आणि चार सप्टेंबर रोजी जीएसटी अर्थात वस्तु आणि सेवा कर परिषदेची छप्पन्नावी बैठक नवी दिल्लीत होणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार आहे. या बैठकी दरम्यान जीएसटीशी संबंधित घेण्यात आलेल्या काही निर्णयांमध्ये बदल करण्याची शिफारस होण्याची शक्यता आहे.

हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून देण्यात येत आहे.

फिजीभेट

फिजीचे पंतप्रधान सिटेनी लिगामामादा राबुका आजपासून तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर येणार आहेत. या शिष्टमंडळात आरोग्य आणि वैद्‌यकीय सेवा मंत्री रातु अटोनियो लालाबालावू आणि वरिष्ठ अधिकारी यांचा समावेश असेल. परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे की, पंतप्रधान राबुका यांचा हा

पहिलाच भारत दौरा असून ते उद्या पंतप्रधान नरेंद्र मोदींशी चर्चा करणार आहेत त्याचबरोबर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही भेट घेतील.

युरोपपोस्टल

नवीन आयात शुल्काबाबत स्पष्टता नसल्याने युरोपमधील अनेक टपाल सेवांनी अमेरिकेला अनेक प्रकारची टपाल सेवा स्थगित केल्याची घोषणा केली आहे. जर्मनी, डेन्मार्क, स्वीडन आणि इटलीमधील टपाल सेवांनी सांगितले की ते बहुतेक वस्तू अमेरिकेत पाठवणे तात्काळ थांबवतील. फ्रान्स,ऑस्ट्रिया आणि इंग्लंड हे देशही टपाल सेवा थांबवणार आहेत. अमेरिकने नव्याने लागू केलेल्या कर प्रणालीमधून सूट मिळालेल्या आंतरराष्ट्रीय वस्तूंवर २९ ऑगस्टपासून आयात शुल्क आकारले जाणार आहे. १०० अमेरिकन डॉलर्सपेक्षा कमी किमतीची पत्रे, पुस्तके, भेटवस्तू आणि लहान पार्सल यांना मात्र यापुढेही सूट मिळणार आहे. गेल्या महिन्यात अमेरिका आणि युरोपियन युनियनने मान्य केलेल्या व्यापार करारानुसार युरोपियन युनियनमधून पाठवल्या जाणाऱ्या बहुतेक उत्पादनांवर १५ टक्के कर निश्चित करण्यात आला.

अमेरिकापोस्टबंद

२५ ऑगस्टपासून भारतातून अमेरिकेला पाठवल्या जाणाऱ्या सर्व टपाल वस्तू तात्पुरत्या स्वरूपात बंद करण्याचा निर्णय केंद्रीय दळणवळण मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या टपाल विभागाने घेतला आहे. अमेरिकन सरकारने दिलेल्या कार्यकारी आदेशानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. या आदेशानुसार ८०० डॉलर्सपर्यंतच्या वस्तूंसाठीची शुल्कमुक्त सूट या महिन्याच्या २९ तारखेपासून रद्द करण्यात येणार आहेत. दळणवळण मंत्रालयाने एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की पत्रं , कागदपत्रं आणि १०० डॉलर्सपर्यंतच्या भेटवस्तूंच्या वस्तू शुल्कमुक्त राहतील. ज्या ग्राहकांनी आधीच आरक्षित केलेल्या वस्तू या परिस्थितीमुळे अमेरिकेला पाठवता येत नाहीत अशा वस्तू टपाल खर्चाची परतफेड मागू शकतात.

अटक

कर्नाटक काँग्रेसचे आमदार के.सी. वीरेंद्र यांना सक्तवसुली संचालनालयाने काल सिक्कीमच्या गंगटोक इथून अटक केली. त्यांच्यावर बेकायदेशीर ऑनलाइन आणि ऑफलाइन बेटिंग रॅकेटमध्ये सहभागाचा आरोप आहे. ईडीने वीरेंद्र यांच्याशी संबंधित किमान 30 ठिकाणी छापे टाकले होते. या कारवाईत 12 कोटी रुपये रोख, 1 कोटी रुपयांचे परकीय चलन, 6 कोटींचे सोन्याचे दागिने, 10 किलो चांदी आणि 4 उच्चमूल्याची वाहने जप्त करण्यात आली. तसेच 17 बँक खाती आणि 2 लॉकर गोठवण्यात आले आहेत. ते विविध कंपन्यांमार्फत कथित ऑनलाइन गेमिंग व्यवसाय चालवत असल्याची माहिती आहे. अटकेनंतर वीरेंद्र यांना गंगटोक न्यायालयात हजर करण्यात आले आहे.के सी वीरेंद्र सध्या कर्नाटकातील चित्रदुर्ग मतदारसंघाचे आमदार आहेत.

अमेरिकनटेनिस

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेला आजपासून न्यूयॉर्कमध्ये सुरुवात होत आहे. पुरूष एकेरीमध्ये जागतिक अव्वल खेळाडू इटलीचा जेनिक सिन्नर आणि दुसऱ्या क्रमांकाचा स्पेनचा कार्लोस अल्कराज, चार वेळा विजेता राहिलेला नोवाक जोकोविच आणि जर्मनीचा अल्केझांडर झावरेव यांचा सहभाग असेल तर

महिलांच्या गटात, गतविजेती बेलारूसची आर्यना सबालेन्का विजेतेपद कायम ठेवण्यासाठी लढेल तर तर जागतिक क्रमवारीत प्रथम क्रमांकाचा इगा स्वाइटेक, कोको गौफ आणि जेसिका पेगुला, मिरा अँड्रीवा आणि एलेना रायबाकिना या प्रमुख महिला खेळाडूंचा खेळ पाहता येणार आहे.

आशियाकप

आगामी आशिया क्रिकेट चषकासाठी भारतीय संघांची घोषणा करण्यात आली आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ सहभागी होणार असून शुभमन गिलकडे उपकर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. ही स्पर्धा ९ ते २८ सप्टेंबर दरम्यान संयुक्त अरब अमिरातीमध्ये खेळवली जाणार आहे. भारतासह पाकिस्तान , अफगाणिस्तान , बांगलादेश , हाँगकाँग , ओमान , श्रीलंका , संयुक्त अरब अमिराती हे संघ या स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

आशियाईनेमबाजी

कझाकस्तान इथं सुरू अकलेल्या 16 व्या आशियाई नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत इलावेनिल वलारिवन, शांभवी क्षीरसागर, नरेन प्रणव यांनी दुसरे सुवर्ण पदक मिळवले. भारताने दहा मीटर नेमबाजी प्रकारात वरिष्ठ आणि कनिष्ठ मिश्र गटात सुवर्णपदक पटकावले, त्यामुळे सुवर्णपदकांची संख्या 23 वर पोहोचली असून भारताने 8 रौप्य, 10 कास्य पदकासह 41 पदके मिळवून भारताने पदकतालिकेत अव्वल स्थान मिळवलं आहे.

## **या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं , नमस्कार.**